महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ६८ वा | दिनांक : ०८/१२/२०२४ | वार : रविवार

## जनतेची दिशाभूल करू नका : शरद पवारांना फडणवीसांचा टोला



**मुंबई :** महाराष्ट्रात ठिकठिकाणी महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण होते. पण निकाल अनुकूल लागला नाही. हे संशयास्पद असल्याचे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी महायुतीला मिळालेल्या मतांच्या आकडेवारीवर देखील भाष्य करत प्रश्न उपस्थित केला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे. जनतेची दिशाभूल करू नका, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे.

शरद पवारांच्या विधानावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मते मिळूनही कमी जागा कशा? चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी आकडेवारीच सांगितली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०२४ च्या लोकसभेत भाजपाला मते १,४९,१३,९१४ आणि जागा ९, पण कॉंग्रेसला मते ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मते आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मते आणि ८ जागा. २०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. कॉंग्रेसला ८७,९२,२३७ मते होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मते होती आणि जागा ४ आल्या. पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल! तुम्ही तरी आपल्या सहकाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे, असे म्हणत टोला देखील लगावला आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींना बॉम्बने उडवण्याची आली धमकी



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बॉम्बने उडवण्याची धमकी असणारा एक मेसेज शनिवारी मुंबई पोलिसांना मिळाला. पाकिस्तानी गुप्तचर संस्थेचे दोन एजंट पंतप्रधान मोदींना बॉम्बने उडवण्याचा कट आखत असल्याचे या मेसेजमध्ये लिहिले होते. मुंबई वाहतूक पोलिसांच्या हेल्पलाईनवर हा मेसेज आला होता. हा मेसेज मिळताच मुंबई पोलिस सतर्क झाली आहे.

या विषयी सांगताना एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले, ज्या नंबरवरून हा मेसेज आला, त्याचा तपास आम्ही केला आहे. हा नंबर राजस्थानच्या अजमेर इथला असल्याचे आम्हाला समजले. तसेच संशयिताला पकडण्यासाठी एक पथक तातडीने राजस्थानकडे रवाना करण्यात आले असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

पुढे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आमच्या वाहतूक नियंत्रण पथकाच्या हेल्पलाइनवर हा धमकीचा मेसेज पहाटेच्या सुमारास मिळाला. या मेसेजमध्ये आयएसआयच्या दोन एजंटांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्येच्या कटासंदर्भात सांगण्यात आले आहे. या मेसेजनुसार, दोन एजंट पीएम मोदींना बॉम्बने उडवण्याचा कट आखत आहेत.

तसेच धमकी देणारी व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्वस्थ अथवा दारूच्या नशेत असावी, असा संशय तपासकर्त्यांना आहे. प्रकरणाचा तपास अद्यापही सुरूच आहे. तथापि, संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय न्यायिक संहितेच्या कलमांतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला आहे. महत्वाचे म्हणजे, यापूर्वीही मुंबई पोलिसांच्या हेल्पलाइनवर असे धमकीचे कॉल आणि मेसेज आले असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने सांगितली आहे.

दरम्यान, या पूर्वी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जीवे मारण्याच्या धमकीचे मेसेज पोलिसांना आले आहेत. यावर पोलिसांनी तातडीने कारवाई देखील केली आहे. आता या प्रकरणात देखील पोलिस तातडीने संशयित व्यक्तीचा शोध घेत अटक करतील, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## हास्य हाच आनंदी जीवनाचा मूलमंत्र : प्रा. विष्णू सुरासे

**सिन्नर :** काही कारणाने आपल्याला दुःखाला सामोरे जावे लागले तरच सुखाची खरी किंमत कळते. मात्र दुःखातही, सावरायला लावण्याची ताकद हास्यामध्ये असते. त्यामुळे जीवन सुखी आणि आनंदी व्हायचे असेल तर हसायला शिका, असे आवाहन प्रा. विष्णू सुरासे यांनी केले.

सिन्नर सार्वजनिक वाचनालयाच्या ग्रंथालय सप्ताहातील 'हास्यतरंग' या विषयावरील चौथे पुष्प त्यांनी गुंफले.

नित्याचे सामान्य जीवन जगत असताना, आपण धीर गंभीर व चिंताग्रस्त होऊन वाटचाल करत असलो तर, आपल्याला विनोद सुचणार नाही व हसताही येणार नाही. त्यामुळे छोट्या छोट्या गोष्टींकडेही, आनंदाने व विनोदाच्या जागा शोधत पाहण्याची सवय आपण करायला हवी. तसे झाले तरच आपल्या शरीर व मनावरील ताण आणि तणाव हलका होतो.

काधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात, पाऊल व पावली अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. यशस्वी व्हायचे असेल तर पळ काढून चालत नाही. त्यामुळे समोर येईल त्या समस्येला, हसतमुखाने सामोरे गेलो तर, समस्येतून मार्ग काढणे सोपे होते.

वाचनालयाचे अध्यक्ष कृष्णाजी भगत यांनी व सुरांचे यांचा परिचय करून दिला. सिटी फ्रेश मॉल च्या वतीने, मिलिंद सतीश गुजराथी यांनी हे व्याख्यान प्रायोजित केले. जितेंद्र जगताप यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

सिन्नर महाविद्यालयाचे प्राचार्य पी. व्ही. रसाळ यांच्यासह श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ डिसेंबर २०२४


## सर्वोच्च न्यायालयाचे मराठा आरक्षण निर्देश लक्षात घ्या!

### तज्ञ अनुभवी विचारवंताकडे कायदेशीर व घटनात्मक मार्ग उपलब्ध






**(राजेंद्र दाते पाटील) :** मागील दिड दोन वर्षापासून मराठा आरक्षणावर विवीध आंदोलन झाली महामोर्चा झाले शक्ती प्रदर्शन झाले, उपोषणे झाली. पदरात पडल्या कुणबी नोंदी ? त्याचेही विरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या आहेत म्हणून आता तरी मराठा आरक्षणावर गांभीर्याने विचार होणार आहे की नाही ? अशी आर्त विचारणा मराठा समाजा कडून होत असुन तज्ञ अनुभवी विचारवंता कडे कायदेशीर व घटनात्मक मार्ग उपलब्ध असल्याची अति महत्वाची चर्चा सुद्धा समाज माध्यमावर होत आहे. आता खरी गरज सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश लक्षात घेण्याची आहे.

वास्तविक पाहता ४०० पेक्षा जास्त ओबीसी जातीशी मराठा समाजास स्पर्धा करावी लागणार आहे याचा सुद्धा गांभीर्याने विचार होणे गरजेचे असुन एक प्रश्न परत उभाच आहे तो म्हणजे ज्यांच्या लांब पर्यंत नोंदी सापडत नाहीत त्यांनी काय करायचं ? बरे या नोंदी म्हणजे काही अंतीम प्रमाणपत्र नाही किंवा त्या अनुषंगाने जात पडताळणी प्रमाणपत्र नाही अशीही गंभीर सल प्रत्येक मराठा व्यक्तीच्या मनात आहेच. मग आता पुढे काय ? हे शोधायचा कायदेशीर प्रयत्न झाला नाही किंवा योग्य मागणीच झाली नाही.

म्हणुनच कदाचित तारीख पे तारीख द्यायची आणि घ्यायची असेच झाले. महाराष्ट्रात ५०% कोटा पुर्ण झालेला आहे मग ५०% आतील आरक्षण दिले की इंद्रा सहानी प्रकरणाचे उल्लंघन होते आणि त्यामुळे न्यायालय स्थगिती देते असे सतत समोर आलेले आहे. मग आता कायदेशीर वाटचाल कशी करायची ? हेच ठरवावे लागणार आहे.

लोकसभे प्रमाणे विधानसभा निवडणुका सुद्धा संपन्न झाल्या ज्यांना जो काही खेळ करायचा होता तो सुद्धा पुर्ण झाला परंतु मराठा समाजाचा आरक्षणाचा प्रश्न सत्ताधारी पक्षांनी निवडणुक चर्चेत घेतला ना पक्षांच्या जाहीर नाम्यात घेतला आहे.मात्र मराठा समाजाला उमेदवार - उमेदवार खेळत-नव्हे हा खेळ समाजास बेमालूमपणे खेळवयास भाग पाडल्या गेला असल्याची तीव्र भावना असुन नेमका भोळ्या भाबड्या स्वभावाच्या समाजाला हे उमजू दिल नाही किंवा कोणी हे कळु सुद्धा दिले नाही.

मुळात ओबीसीतून मराठा आरक्षण ही मागणीच मान्य करायला एकही राजकीय पक्ष तयार नव्हता आणि अजूनही नाही.अशा स्थितीत आरक्षण कसे मिळेल ? याचे उत्तर शोधणे अत्यावश्यक झाले असल्याची सामान्य मराठा व्यक्तीची असुन सर्व राजकीय पक्ष आणि लोकप्रतिनिधी सांगत होते की,आम्ही कोणाच्या ही आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देणार आणि खरंच एकही पक्ष-लोकप्रतिनिधी या वर बोलत नाही ना काही कृती करत आहे.

या धोरणामुळे अनेक तरुणांचं नोकरीमध्ये शिक्षणा मध्ये नुकसान झाले आहे व होत राहणार आहे.

अनेकांनी तर हताश होऊन आत्महत्या केल्या आणि आजही कुठे ना कुठे कोणतरी मराठा बांधव आत्महत्या करत आहे .होत असलेल्या नुकसानीला जबाबदार कोण?हे आता किती दिवस चालायचे त्या करता आता ठोस निर्णय घ्यावा लागणार आहे. ३४० कलमाचा म्हणजे परीच्छेदाचा अवलंब केला की इंद्रा सहानी जजमेंट आडवे येते आणि त्या ही वर जर राज्य शासनाने आरक्षण जाहीर केले की ३६८ कलमाचा तथा परीच्छेदाचा भंग होतो.

शासनास काही कायदा किंवा त्यात दुरूस्ती करावयाची असेल तर दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता असते ही घटनात्मक तरतुद आहे. मराठा आरक्षण प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे आणि कोर्टा मध्ये आरक्षण विरोधी टीम एका गोष्टी मधून विरोध करते की, ५० % पुढच आरक्षण इंद्रा सहानी निर्णया मुळे राज्य सरकारला देता येत नाही.

मराठा समाजा च्या हितासाठी आता सामूहिक निर्णय घेऊन नियोजना साठी राज्यव्यापी मिटींग घेणे गरजेचे झाले असुन याची सर्व मराठा बांधवांनी नोंद घ्यावी अशी जोरदार मागणी होत असुन काही तज्ञ अनुभवी विचारवंतांनी या वर कायदेशीर मार्ग काढून ठेवलेला आहे. त्याचा लाभ मराठा समाजाला मिळू द्यावा अशीही मागणी जोर धरत असुन चला तयारीला लागुयात असे म्हणणारा मोठा वर्ग तालुक्या तालुक्यात निर्माण झाला असुन या गंभीर विषयावर "राज्यव्यापी मराठा आरक्षण सत्य शोधन परिषद "आयोजीत होणे गरजेचे असुन फक्त घटनात्मक व कायदेशीर विषयावर सदर परिषद आयोजीत करण्याचा मानस राज्य भर निर्माण झाला आहे.






## मविआला अनुकूल वातावरण होते; पण निकाल अनुकूल आला नाही : शरद पवार

**कोल्हापूर :** महाराष्ट्रात ठिकठिकाणी महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण होते. पण निकाल अनुकूल लागला नाही. हे संशयास्पद आहे. पण हातात प्रामाणिक पुरावे असल्याशिवाय त्याची कारणमीमांसा करणे योग्य नाही, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी सायंकाळी व्यक्त केले. ते कोल्हापुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

शरद पवार शुक्रवारी कोल्हापूरच्या दौऱ्यावर होते. तिथे पत्रकारांशी वार्तालाप करताना त्यांनी विधानसभा निवडणुकीतील निकालाची आकडेवारी आश्चर्यकारक असल्याचा दावा करत एकप्रकारे त्यावर संशय व्यक्त केला.

शरद पवार म्हणाले, विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर राज्यात एक उत्साहाचे वातावरण असते. पण महाराष्ट्रात तसे वातावरण दिसत नाही. पण उगीचच आरोप करणे योग्य नाही. माझ्याकडे यासंबंधी अधिकृत अशी माहिती नाही. आम्ही केवळ काही आकडेवारी गोळा केली. त्यात निवडणूक लढवणाऱ्या राजकीय पक्षांना मते किती पडली? व त्यांचे किती जण निवडून आले? हे पडताळून पाहिले. त्यात काँग्रेसला ८० लाख मते पडली. पण त्यांची केवळ १५ उमेदवार निवडून आले. याऊलट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला काँग्रेसहून १ लाख कमी म्हणजे ७९ लाख मते पडली. पण त्यांचे तबब्ल ५७ उमेदवार निवडून आले. म्हणजे ८० लाख वाल्यांचे १५ व ७९ लाख वाल्यांचे ५७.

दुसरीकडे, आम्हाला म्हणजे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाला ७२ लाख मते पडली. आमचे उमेदवार निवडून आले १०. याऊलट अजित पवार गटाला ५८ लाख मते पडली. पण त्यांचे ४१ उमेदवार निवडून आले. म्हणजे ७२ लाख वाल्यांचे १० आणि ५८ लाख वाल्यांचे ४१ उमेदवार निवडून आले. यात काहीतरी चूक आहे. हातात काहीतरी ठोस आधार असेपर्यंत त्यावर बोलणे योग्य नाही. पण मतांचे आकडे आश्चर्यकारक आहेत, असे शरद पवार म्हणाले.

पत्रकारांनी यावेळी ईव्हीएमच्या मुद्यावर भविष्यात विरोधकांची कोणती भूमिका असणार? असा प्रश्न केला असता शरद पवार पुढे म्हणाले, यावर आताच भाष्य करणे योग्य नाही. आज सकाळी मी विधानसभेची काही माहिती घेतली. त्यांचे म्हणणे एकच होते की, लोकसभा निवडणुकीत तुम्ही ईव्हीएमची तक्रार केली नाही. पण आता विधानसभा निवणुकीतील पराभवानंतर तुम्ही त्यावर कसा संशय घेता? यावर आमचे निरीक्षण असे आहे की, गत काही महिन्यांत ४ राज्यांच्या निवडणुका झाल्या. हरियाणात मी स्वतः गेलो होतो. तिथे भाजपची अवस्था अतिशय कठीण होती. पण त्यानंतरही भाजप तिथे सत्तेत आला. त्याचवेळी जम्मू काश्मीरमध्ये फारुख अब्दुल्ला यांचा पक्ष सत्तेत आला. तिथे काँग्रेसचा पराभव झाला.

महाराष्ट्राच्या निवडणुकीतही भाजपला यश आले. पण त्याचवेळी झारखंडमध्ये भाजपचा पराभव झाला. त्यामुळे सत्ताधारी पक्ष आम्ही इकडे जिंकलो आणि तिकडे आमचा पराभव झाला. त्यामुळे त्याचा ईव्हीएमशी काही संबंध असे सांगू शकतात. पण या पॅटर्नमधून मोठ्या राज्यांत भाजप आणि छोट्या राज्यांत विरोधी पक्ष असे चित्र स्पष्ट होते, असे शरद पवार म्हणाले.

मी उद्या मारकडवाडी येथे जाऊन तेथील लोकांशी संवाद साधणा असल्याचेही शरद पवारांनी यावेळी सांगितले. आता निवडणूक प्रक्रिया संपली आहे. मारकडवाडी येथे बंदी घालण्याचे कारण काय? त्या गावातील लोकांना पाहायचे होते की, मते कुणाला किती पडली. त्यामुळे आम्ही आता तेथील लोकांचे काय म्हणणे आहे हे जाणून घेण्याचे ठरवले आहे.

तसेच आगामी निवडणुका एकत्रपणेच लढवण्याचा निर्धारही व्यक्त केला. आम्ही एकत्रपणे येणाऱ्या सर्व निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. पराभव झाला म्हणून नाराज व्हायचे कारण नाही. सप नेते मी अबू आझमी यांचे विधान ऐकले आहे. पण त्यांची भूमिका त्यांच्या पक्षाच्या राष्ट्रीय नेत्याची नाही. त्यांच्या नेत्यांनी महाविकास आघाडीसोबतच राहण्याची इच्छा व्यक्त केली आहे, असे ते म्हणाले.

शरद पवार पुढे म्हणाले, मी मागील ४०-५० वर्षांपासून सभा घेत आहे. आमच्या सभांना प्रचंड प्रतिसाद मिळत होता. त्यामुळे निकाल काय लागणार हे वेगळे सांगण्याची गरज नव्हती. महाराष्ट्रात ठिकठिकाणी महाविकास आघाडीला अनुकूल वातावरण होते. पण निकाल अनुकूल लागला नाही. हे आश्चर्यकारक आहे. पण हातात प्रामाणिक पुरावे असल्याशिवाय त्याची कारणमीमांसा करणे योग्य नाही.

## आमदारांना शपथ देण्याची प्रक्रिया सुरू

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन आजपासून सुरू झाले. नवीन सरकारच्या स्थापनेनंतर भाजपचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी महाराष्ट्र विधानसभेचे प्रोटेम स्पीकर म्हणून कालच शपथ घेतली.

नऊ वेळा आमदार राहिलेल्या कोळंबकर यांना राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी राजभवनात शपथ दिली. आता कोळंबकर हे सर्व आमदारांना विधानभवनात शपथ देत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०८ डिसेंबर २०२४


## बालरंगभूमी परिषदेचे 'बालरंगभूमी संमेलन' २० ते २२ डिसेंबरला पुण्यात होणार




**पुणे** : बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित 'बालरंगभूमी संमेलन' पुणे येथील अण्णाभाऊ साठे स्मारक, बिबवेवाडी येथे दिनांक २०, २१ व २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात येणार असल्याची घोषणा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अभिनेत्री ॲड निलम शिर्के सामंत यांनी केली. पत्रकार परिषदेस बालरंगभूमी परिषदेचे कार्याध्यक्ष राजू तुलालवार, उपाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे, दीपा क्षीरसागर, प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, कोषाध्यक्ष नंदकुमार जुवेकर, पुणे शाखेच्या अध्यक्ष दिपाली शेळके, कार्यकारी सदस्य दिलीप रेगे, योगेश शुक्ल, नागसेन पेंढारकर, अनंत जोशी, पुणे शाखेचे पदाधिकारी देवेंद्र भिडे उपस्थित होते.

ॲड. नीलम शिर्के-सामंत म्हणाल्या, शिक्षण हा बालकाचा अधिकार आहे आणि कलाशिक्षण बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाची गरज आहे. बालकांच्या मनोरंजनासाठी व प्रबोधनासाठी बालरंगभूमी परिषद सातत्याने कार्यरत आहे.

बालरंगभूमी संमेलनाध्यक्षपदी सिने-नाट्य अभिनेते मोहन जोशी यांचे नाव निश्चित झाले असून, संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते होईल. प्रमुख पाहुणे नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले, अभिनेते सयाजी शिंदे, अजित भुरे, अभिनेते व सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष विजय गोखले, सविता मालपेकर, सुबोध भावे यांच्यासह नाट्य व बालनाट्य क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तसेच संमेलन समारोप व पुरस्कार सोहळा दिनांक २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून या प्रसंगी बालरंगभूमी परिषद पुरस्कार जेष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना देण्यात येणार आहे. याप्रसंगी डॉ. मोहन आगाशे, सचिन पिळगावकर, मोहन जोशी, गंगाराम गव्हाणकर, प्रियदर्शनी इंदुलकर, गणेश मतकरी, ऋजुता देशमुख व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सलील कुलकर्णी, संदीप खरे, पद्मश्री परशुराम गंगावणे, श्री उदय देशपांडे, मेघना एरंडे, शैलेश दातार यांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे.

बालकलावंत मायरा वायकुळ, निलेश गोपणार, स्वरा जोशी व इतर बाल कलावंताचे सादरीकरण होणार आहे. संमेलनानिमित्त बाल कलावंतांची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात विविध कलांचे, चित्ररथांचे प्रदर्शन केले जाणार आहे. बालरंगभूमी संमेलनात महाराष्ट्राभर नावाजलेले बालनाट्य, बालकलावंतांचे सर्वोत्कृष्ट असलेले लोककलेचे कार्यक्रम तसेच महाराष्ट्रातील विविध दिव्यांग संस्थांच्या बालकलावंतांचे नामांकित कार्यक्रम, गायन, वादन, नृत्य, एकपात्री, नाट्यछटा, जादूगार, बोलक्या बाहुल्यांचे खेळ, पपेट शो, नाटुकल्या, ग्रिप्स थिएटर आदी भरगच्च कार्यक्रम संमेलनात सादर होणार आहेत.

संमेलनाच्या निमित्ताने कलादालनाची निर्मिती करण्यात आली असून यात चित्र, शिल्प, रांगोळी, हस्तकला, मुखवटे आदींचे प्रदर्शन व प्रशिक्षण ठेवण्यात आलेले आहे. तसेच उपमंचावर देखील बाल कलावंतांच्या विविध एकल कलांचे सादरीकरण होणार आहे, असे नीलम शिर्के सामंत यांनी नमूद केले.

## २४ वे साहित्यिक कलावंत संमेलन : अध्यक्षपदी प्रा. प्रवीण दवणे यांची निवड



**पुणे** : साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान, पुणेतर्फे आयोजित २४ वे साहित्यिक कलावंत संमेलन यंदा दिनांक २७ ते २९ डिसेंबर २०२४ या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाटयगृह, कोथरुड, पुणे येथे होणार असून या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखक, कवी आणि गीतकार प्रा. प्रवीण दवणे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती साहित्यिक कलावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप बराटे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविली आहे.

मराठी कविता आणि गीत लेखन क्षेत्रात प्रा. प्रवीण दवणे यांचे बहुमोल योगदान आहे. आजपर्यंत त्यांची ६० हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कविता, कादंबरी, ललित, वैचारिक, नाटक आणि बालसाहित्य अशा सर्व लेखन प्रांतात त्यांनी आपले योगदान दिले आहे. तसेच अनेक चित्रपटांसाठी देखील त्यांनी गीतलेखन केले आहे. 'मंथन', 'चेहरा' अंधाराचा', 'सापशिडी', 'विरामचिन्हे', 'मनाच्या मध्यरात्री', 'तिचं आकाश', 'ध्यानस्त', 'गंधखुणा', 'रूजवात', 'एक कोरी सांज', 'रंगमेघ' ही पुस्तके विशेष गाजलेली आहेत.

साहित्यिक कलावंत संमेलन अध्यक्षांची परंपरा खूप मोठी आहे. या यापुर्वी नारायण सुर्वे, डॉ. आ. ह. साळुंके, उत्तम कांबळे, डॉ. सदानंद मोरे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. नरेंद्र जाधव, भारत सासणे, डॉ. तारा भवाळकर, विश्वास पाटील आणि अशोक नायगावकर यासारख्या मान्यवर साहित्यिकांनी या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## ११ वर्षीय मुलीचा ब्लेडने गळा कापून खून

**हिंगोली** : हिंगोली तालुक्यातील नांदूसा येथे एका ११ वर्षीय मुलीचा तिच्या घरात जाऊन ब्लेडने गळा कापून खून करणाऱ्या तरुणाला जन्मठेप व ५००० रुपये दंडाच्या शिक्षेचा निर्णय जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधिश आर. व्ही. लोखंडे यांनी शनिवारी ता. ७ दिला आहे.

याबाबत सहाय्यक सरकारी वकिल ॲड. सविता देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदूसा येथील एक कुटुंब ता. २१ मे २०२० रोजी शेतात कामासाठी गेले होते. काडीकचरा पेटवून देण्यासाठी त्यांच्याकडे काडेपेटी नसल्याने त्यांनी गावातील बालाजी उर्फ गोपाल आडे याच्याशी मोबाईलवरून संपर्क साधून घरी जाऊन मुलास काडेपेटी घेऊन पाठविण्याचे सांगितले. त्यानंतर मुलगा काडेपेटी घेऊन शेतात गेला.

दरम्यान, काही वेळानंतर त्या कुटुंबाची ११ वर्षीय मुलगी व एक मुलगा घरी आले. यावेळी बालाजी उर्फ गोपाल याने त्या मुलास मोबाईलवर पब्जी गेम लाऊन बालाजीच्या शेतात बसविले व तो मुलीच्या घरी गेला. त्यानंतर त्याने ११ वर्षीय मुलीचा ब्लेडने गळाकापून खून केला. काही वेळानंतर त्या कुटुंबातील दुसरा मुलगा घरी आला असतांना त्याने त्याची ११ वर्षीय बहिण गळा कापलेल्या अवस्थेत असल्याचे दिसून आले. त्याने शेतात जाऊन हा प्रकार सांगितल्यानंतर सर्वच कुटुंब घरी आले. त्यांनी मुलीला पाहिले असला तिचा गळा कापलेला असल्याचे दिसून आले. यामध्ये ती मुलगी मयत झाली होती.

या प्रकरणी बालाजी उर्फ गोपाल आडे याच्या विरुध्द बासंबा पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. तत्कालीन पोलिस उपाधिक्षक रामेश्वर वैंजने यांच्या पथकाने अधिक तपास करून न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले. सदर प्रकरणात १७ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी बालाजी उर्फ गोपाल आडे यास जन्मठेप व ५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकिल ॲड. सविता देशमुख यांनी काम पाहिले त्यानंतर ॲड. एस. डी. कुटे, ॲड. एन. एस. मुटकुळे यांनी सहकार्य केले. पैरवी अधिकारी म्हणून बासंबा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक ए. डी. डोईजड यांनी काम पाहिले.

## कोलकात्यात महिला शिक्षिकेची आत्महत्या

**कोलकाता** : कोलकाता, पश्चिम बंगालमध्ये महिला शिक्षिका जसबीर कौर (५८) यांनी फेसबुक लाईव्ह करून आत्महत्या केली. ही घटना ५ डिसेंबर रोजी घडली. आत्महत्येदरम्यान महिलेने शाळेचे मुख्याध्यापक आणि व्यवस्थापनावर मानसिक छळ केल्याचा आरोप केला.

जसबीर यांचा मृतदेह दक्षिणेश्वर भागातील त्यांच्या अपार्टमेंटमध्ये लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांचा भाऊ जसबिंदर सिंग यांनी खालसा मॉडेल सीनियर सेकेंडरी स्कूल (KMSSS) च्या मुख्याध्यापिका गुरमीत कौर अर्जानी, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दविंदर सिंग बेनिपाल, सचिव गुरदेव सिंग लापरन आणि इतरांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला होता.

पोलिसांनी या सर्वांना चौकशीसाठी बोलावले आहे. बराकपूरचे पोलीस आयुक्त आलोक राजोरिया म्हणाले- गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एफआयआरमध्ये ज्या लोकांची नावे आहेत त्यांची चौकशी केली जात आहे. याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.

पोलिसांनी सांगितले की, कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, जसबीर यांच्या पतीची २००३ मध्ये हत्या झाली होती. त्यांची दोन मुले परदेशात राहतात. अपार्टमेंटच्या पहिल्या मजल्यावर जसबीर एकट्याच राहत होत्या.

शाळेच्या अधिकाऱ्यांनी छळाचे आरोप फेटाळून लावले आहेत. व्यवस्थापन समितीचे सदस्य गुरबिंदर सिंग म्हणाले- जसबीर एकट्या राहिल्याने डिप्रेशनमध्ये होत्या आणि बीएड प्रमाणपत्र देऊ न शकल्यामुळे त्या अस्वस्थ होत्या.

जसबीर यांचे माझ्याशी चांगले संबंध असल्याचे त्यांनी सांगितले. तीन दिवसांपूर्वी त्यांनी मला शाळेच्या गेटवर त्यांच्यासाठी काहीतरी करायला सांगितले होते. त्यावेळी त्या काय बोलू पाहत होत्या ते मला समजले नाही.

जसबीर यांच्या भावाने सांगितले की, माझ्या बहिणीला शिक्षक प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक आणि इतर सदस्य दररोज मानसिक छळ करत होते.

जसबीर यांना पेन्शन, पीएफ, पदवी आणि सेवानिवृत्तीचे लाभ रोखण्याची धमकी दिली जात होती. यामुळे त्यांनी आत्महत्या केली. सर्व आरोपींना शिक्षा झाली पाहिजे.

शाळेशी संबंधित लोकांनी सांगितले की, जसबीर या शाळेच्या विद्यार्थी होत्या. गेल्या २२ वर्षांपासून त्या याच शाळेत शिकवत होत्या. विद्यार्थी जसबीर यांना आंटी मॅडम म्हणायचे.

Mishri Shikshan Prasarak Mandal

# Navkar D & B Pharmacy College & Research Centre

D.T.E. CODE 02762
Jain Minority

Affordable education begins here

## D. Pharm / B. Pharm First YEAR

# ADMISSION NOTIFICATION 2024-25

Application are invited from the eligible candidate in the prescribed forms under against CAP / Institute Level quota

| SCHEDULE | D. Pharm | B. Pharm |
|---|---|---|
| Display of Vacancy & Start of admission Request form in college | 08/12/2024 | 18/12/2024 |
| Last date of Submission of Admission request form in college | 08-10/12/2024 | 18-19/12/2024 |
| Display of College provisional merit List | 10/12/2024 | 19/12/2024 |
| Objection/Grievance, If any pertaining to merit List | 11/12/2024 | 20/12/2024 |
| Display of College Final merit List | 11/12/2024 | 20/12/2024 |
| Admission Councelling & Spot Admission as per College Final merit List (CFML) | 12-13/12/2024 | 21-23/12/2024 |
| CUT-Off Date for all types of Admission for acadmic year (2024-25) | 13/12/2024 | 23/12/2024 |

(1) Application Forms and prospectus will be available on payment of Rs. 100/-
(2) All Admission will be carried out as per guidance of DTE, ARA & MS-CET Cell GOVT of Maharashtra Mumbai for the session 2024- 2025
(3) The merit List for the candidate shall be prepared amongst the application receive and marks secured by the candidate in HSC/CET/NEET.
(4) The provisional admission will be confirmed on the spot as per CFML after receiving of all the required original documents along with prescribed Fees.
(5) For any other details please contact college.

principalnavkarpharmacy@gmail.com
8888439740/ 9975117969
Mahatma Gandhi Road, Gut No 158, Behind Kasliwal Tarangan, Mitmita-Padegaon, Chh. Sambhajinagar